**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू बळीराम सूर्यवंशी
३१५, ए वॉर्ड, लक्षतीर्थ वसाहत, कमानीजवळ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य,
रायगड भवन, पहिला मजला, रिअर विंग, नवी मुंबई-१६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बालविकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी प्रकल्प),

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५८ / कोल्हापूर / [illegible] |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजू बळीराम सूर्यवंशी
३१५, ए वॉर्ड, लक्षतीर्थ वसाहत, कमानीजवळ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य,
रायगड भवन, पहिला मजला, रिअर विंग, नवी मुंबई-१६ श्री.टी.आर.दराडे

**जन माहिती अधिकारी** तथा बालविकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी प्रकल्प), प्रार्थना हॉटेल, दुसरा मजला, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर श्री.अे.जे.गजगेश्वर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नेमणुकीबाबतची चार मुद्दयांची माहिती आपण मागितली होती. त्यातील तीन मुद्दयांची माहिती समाधानकारक मिळाली. मात्र अंगणवाडी सेविका सौ.वैशाली ऊर्फ वसुधा संजय अ़र्दाळकर यांची नेमणूक कागदपत्रांची सत्यता न पडताळता झालेली असल्यामुळे व त्यांच्या कागदपत्रांमध्ये खोट्या नोंदी असल्यामुळे माहिती खोटी, अपुरी व दिशाभूल करणारी आहे, म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजू बळीराम सूर्यवंशी यांनी केली.

उपलब्ध दप्तरातून सर्व माहिती श्री.सूर्यवंशी यांना मुदतीत देण्यात आली. सौ.अर्दाळकर यांच्या बाबतीत दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या आदेशानुसार या नेमणुकीबाबतची स्पष्टीकरणात्मक माहितीही श्री.सूर्यवंशी यांना दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी प्रकल्प), कोल्हापूर श्री.अे.जे.गजगेश्वर यांनी केले.

जन माहिती अधिकारी श्री.गजगेश्वर यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली आहे. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन करणारे स्पष्टीकरणही दिले आहे. 'सौ.अर्दाळकर यांनी अनुभवाचे खोटे प्रमाणपत्र सादर केले आहे,' 'एकाच कार्यक्षेत्रातून एका जागेसाठी आलेल्या पाच अर्जातून तीन

उमेदवारांची निवड एकदम होणे ही आश्चर्याची गोष्ट वाटते,' अशा स्वरूपाचे आक्षेप श्री.सूर्यवंशी यांनी नोंदविले आहेत, त्यांची दखल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये घेता येणार नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१२.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. इमतियाज महिबुब बागवान — अपीलकर्ता
२६६, गुरूवार पेठ, भाजी मार्केट, कराड
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
कराड नगर परिषद, कराड, जि. सातारा — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
कराड नगर परिषद, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | ६.५.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** : श्री. इमतियाज महिबुब बागवान
२६६, गुरूवार पेठ, भाजी मार्केट, कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी,
कराड नगर परिषद, कराड, जि. सातारा
श्री. के. एन. कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
कराड नगर परिषद, कराड, जि. सातारा श्री. ए.एन. मुल्ला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कराड नगरपरिषदेच्या हद्दीत झालेल्या रस्ता रूंदीबाबत सहा टप्प्यांच्या ठिकाणांची रस्ता होण्याच्या आधीची व नंतरची रूंदीची, तसेच मिळकतधारकाला दिलेल्या चटईक्षेत्र निर्देशांची माहिती आपण मागितली होती. ती दिलेली नाही. धार्मिक स्थळ असलेली ऐतिहासिक इमारत पाडणार नाही, असे नगर परिषदेने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले आहे, तरीही १९७६ मध्ये बांधकाम पाडले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. इमतियाज महिबुब बागवान यांनी केली.

संबंधित रस्त्याबाबतचा नकाशा व अन्य कागदपत्रे श्री. बागवान यांना दाखविण्यात आली. रस्त्याच्या रूंदीबाबतची हवी असलेली कोणतीही नक्कल त्यांना देण्याची तयारी असल्याचे त्यांना कळविले. प्रत्यक्ष रस्त्याची मोजणी करून मापे द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. चटईक्षेत्र निर्देशांक कोठेही वाढवून दिलेला नाही. सन १९९६ मध्ये नगरपरिषद, व्यापारी व जामा मज्जिद (मनोरे ) ट्रस्टचे ट्रस्टी यांच्यामध्ये करार झाला. तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, कराड यांना मोजणीचे आदेश देण्यात आले. मिळकतदारांना तसे कळवूनही कोणीही मोजणीचे शुल्क भरलेले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कराड नगरपरिषद श्री. ए. एन. मुल्ला यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे, मात्र समक्ष रस्त्याची रुंदी मोजणी करुन व स्केलनुसार पूर्वीच्या रस्त्याची रुंदी पाहून, तसेच प्रत्यक्ष जागेवर बांधकामाच्या चटई क्षेत्राची मोजणी करुन अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार प्रत्यक्ष मोजणी करुन श्री. बागवान यांना दिलेल्या माहितीचा तपशील जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग, कराड नगर परिषद, कराड श्री. ए.एन मुल्ला यांनी दि. ३.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला. तो पाहता माहिती बाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर चिंतामण कुलकर्णी
अक्षय, २२, आनंद सह.गृहनिर्माण संस्था,
शाहूनगर, गोडोली, सातारा
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर चिंतामण कुलकर्णी
अक्षय, २२, आनंद सह.गृहनिर्माण संस्था, शाहूनगर, गोडोली, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्रीमती चारूशीला तांबेकर

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री.गो.ग.आल्हाट

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक यांना द्यावयाच्या वेतनश्रेणीबाबत सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप हत्तीरोग व जडजन्य रोग) यांनी दि.५.५.२००८ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाला अद्याप मान्यता मिळालेली नाही. चार वर्षांपासून याबाबत पत्रव्यवहार चालू असून प्रकरण सार्वजनिक आरोग्य विभागात प्रलंबित आहे. कर्मचाऱ्यांकडून अतिप्रदान वसुलीचे आदेश दिले जात आहेत. त्यामुळे ११-१-अ प्रमाणे वेतननिश्चितीस मान्यतेचे आदेश द्यावेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रभाकर चिंतामण कुलकर्णी यांनी केली.

श्री.कुलकर्णी यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती तयार असल्याचे त्याना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग /सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री.गो.ग.आल्हाट यांनी केले.

श्री.कुलकर्णी यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असली तरी त्या संदर्भातील सद्यस्थितीची माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे. एक आठवड्यात त्यांना ती दिली जावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाच्या अनुपालनाचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग /सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री.गो.ग.आल्हाट यांनी १५.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.२०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेश रमेश गुजर
एल.आय.सी.कॉलनी, ई-१६,
सेक्टर-३, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस हेडक्वार्टर सातरा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
सातारा विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस हेडक्वार्टर सातारा, जि.सातारा डॉ.दिगंबर प्रधान

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
सातारा विभाग, सातारा प्रतिनिधी डॉ.दिगंबर प्रधान

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.८.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.९.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या वडिलांच्या दुचाकीच्या चोरीबाबतची चुकीची माहिती आपल्याला दिली गेल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.राजेश रमेश गुजर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

श्री.गुजर यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या दुचाकीच्या चोरीच्या तपासाबाबतची माहिती श्री.गुजर यांना देण्यात आली. गाडीचा क्रमांक व वर्ष यात टंकलेखनात चूक झाल्यामुळे त्यांनी अपील केले. ही चूक असल्याचे कळवून व ती दुरूस्त करून तसे त्यांना कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस हेडक्वार्टर, सातारा डॉ.दिगंबर प्रधान यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

उभय बाजूंनी निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जवाहरलाल आण्णासाहेब रोटे **अपीलकर्ता**
६४४ ई, १ ली गल्ली, शाहूपुरी, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक : २७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.बाबासाहेब वाघमोडे
**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.शरद वसंतराव पाटील

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | ४.९.२००८ व १८.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | १८.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | ६.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मौजे कळंब तर्फे ठाणे, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथील गट क्र.४६०/पै/१ मधील फेरफार ३८०५, ३१६५, २२३०, गट क्र.४२२/पै/२ फेरफार क्र.५०८१, २०३० व ३८०५ वरील सर्व ठराव व उतारे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२७.१०.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे अपिलाच्या सुनावणीलाही गैरहजर होते.

जमिनीच्या फेरफारामधील नोंद ज्या अर्जाने केली, त्याची सही-शिक्क्याची नक्कल न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.जवाहरलाल अण्णासाहेब रोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अभिलेखांची पडताळणी करून फेरफारातील नोंद कशाप्रकारे झाली, याची माहिती संबंधित नोंदीच्या फेरफार पत्रकाच्या छायांकित प्रतीसह श्री.रोटे यांना कळविली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.शरद वसंतराव पाटील यांनी सांगितले. श्री.रोटे यांनी उल्लेख केलेली नोंद सन १९६२ मधील आहे. त्यासाठी दिलेला वर्दी अर्ज हा क वर्गातील अभिलेख असून त्याची जतन करण्याची मुदत पाच वर्षे आहे. अन्य उपलब्ध माहिती, त्यांना देण्यात आली. सुनावणीच्या तारखा दोनवेळा देऊनही ते उपस्थित नव्हते, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, करवीर, जि.कोल्हापूर श्री.बाबासाहेब वाघमोडे यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.बबन निवृत्ती जाधव
मु. हिंगणी, पो. केत्तूर नं२, ता. करमाळा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,
करमाळा, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
हिंगणी वि. का. सेवा सहकारी संस्था, हिगणी, ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता :-** श्री. बबन निवृत्ती जाधव<br>मु. हिंगणी, पो. केत्तूर नं. २,ता. करमाळा जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** :- सहायक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, जि. सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** :- सचिव, हिंगणी वि. का. सेवा सहकारी संस्था, हिंगणी, ता. करमाळा, जि. सोलापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.०९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ----- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.०५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.६.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

हिंगणी विकास सेवा सहकारी संस्थेची आपण मागितलेली माहिती प्राप्त झालेली असून तक्रार नाही,असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.बबन निवृत्ती जाधव यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१९.११.२००९**

29=10=2009

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर शंकरराव साळुंखे
महालक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, पहिला मजला,
जरगनगर जकात नाक्याजवळ, पाचगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास,
राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास,
राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.२.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.अल्लाउद्दीन मकबूल शेख<br>**जन माहिती अधिकारी** तथा भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.अनिल एस. शर्मा | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-यानें निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

भ्रष्टाचाराविरूध्द जनआंदोलन न्यास, राळेगण सिध्दी यांच्याकडे माहितीची मागणी केलेल्या अर्जावर उत्तर न आल्यामुळे चौकशी केली असता अर्जच मिळाला नसल्याचे खोटे सांगण्यात आले. माहितीसाठी टपाल खर्चासह २१ रुपये खर्च झाला असताना आकारलेल्या २९ रूपयांच्या शुल्कातील ८ रूपये परत न करणे हा भ्रष्टाचार आहे. अपूर्ण व संदिग्ध माहिती देण्यात आली आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रभाकर शंकरराव साळुंखे यांनी अपील अर्जात केली आहे.

श्री.साळुंके यांनी मागितलेली माहिती योग्य ते शुल्क आकारून देण्यात आली. प्रथम अपिलाच्या सुनावणीला दोन तारखा देऊनही ते गैरहजर होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.अनिल एस.शर्मा यांनी केले.

श्री.साळुंके यांनी अर्जात व अपिलात अनेक सूचना केल्या असून न्यासाच्या कार्यपध्दतीसंबंधी भाष्य केले आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. आवश्यक वाटल्यास न्यासाने तो विचार करावयाचा आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.११.२००९**

(स्वाक्षरी)
(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. रमेश वसंतराव देशपांडे
२९, श्री गणेश सहकारी गृहनिर्माण मंडळ,
शारदा सोसायटी जवळ, जुळे सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक संचालक (सहकार),
समाजकल्याण संचालनालय, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सह संचालक (शिक्षण.),
समाजकल्याण संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक संचालक (सहकार), समाजकल्याण संचालनालय, पुणे प्रतिनिधी श्री.बी.जी.कांबळे<br>**जन माहिती अधिकारी तथा** सह संचालक (शिक्षण) समाजकल्याण संचालनालय, पुणे श्री.आर.बी.कुमावत | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख . | दि-- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** दि.२७.४.२००७ च्या पत्रान्वये विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,सोलापूर यांच्याकडून खरेदी केलेल्या जमीनीची माहिती मागविण्यात आली होती ती माहिती कार्यालयास प्राप्त झाली काय,नसल्यास ती मिळविण्यासाठी काय कार्यवाही केली,माहिती प्राप्त झाली असल्यास प्रत मिळावी,दि.२७.४.२००७च्या पत्रामध्ये नमूद केलेल्या अमरावती, वाशीम, बुलढाण, यवतमाळ, नागपूर,भंडारा,हिंगोली जिल्हयात खरेदी केलेल्या जमिनीबाबत माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त य
अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात
आली.

अपीलकर्ता श्री.रमेश वसंतराव देशपांडे यांनी विशेष समाजकल्याण अधिकारी (गट-अ), सोलापूर यांच्या
करवी, समाजकल्याण विभागाने खरेदी केलेल्या जमिनींबाबत दोन अर्जाद्वारे माहिती मागितली होती. माहिती सोलापूर
कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दोन्ही अर्ज विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी(गट-अ), सोलापूर, जिल्हा
परिषद, सोलापूर यांच्याकडे पाठविले. सन १९६० मधील जमीन खरेदी असून सन १९७७ मध्ये महसूल विभागाने
मागासवर्गीय लाभार्थींना परस्पर घरकुले बांधून दिल्याचे तहसीलदार, बार्शी याना दि.१६.९.२००८ रोजी कळविले
विषयातील गुंतागुंतीमुळे माहिती देण्यास विलंब होईल याची कल्पना श्री.देशपांडे यांना 'विशेष अपील निर्गत
कार्यक्रमा'च्या वेळीही देण्यात आली होती, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, (सहकार)
समाजकल्याण संचालनालय, पुणे श्री.आर.बी.कुमावत यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.




(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक ६९.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजाराम मारूती घोरपडे
रा.का.कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव / अध्यक्ष, श्रीराम सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित,
कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७९ / कोल्हापूर / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९ . ३ .२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री. श्री.बी.आर.डोंगळे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव / अध्यक्ष, श्रीराम सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित,
कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे

## विवेचन

पाणीपुरवठा संस्थेचे आपण अध्यक्ष असताना सचिवांनी आपल्याला कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखविली नाहीत. म्हणून आपण काही माहिती मागितली होती. परंतु जन माहिती

अधिकारी तथा सचिव / अध्यक्ष, श्रीराम सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित, कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.राजाराम मारूती घोरपडे यांनी केले.

आपल्या कार्यालयाच्या स्तरावरील माहिती मुदतीत दिली. संस्थेच्या स्तरावरील माहिती संस्थेकडून मागवून देण्यात येईल, असे अपीलकर्त्यास स्पष्ट केले होते. संस्थेकडून माहिती मागविली होती, ती लवकर न मिळाल्यामुळे देता आली नाही, आज सोबत आणली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव / अध्यक्ष, श्रीराम सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित, कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांनी नमूद केले. सचिव व अध्यक्ष यांनी वर्षभर एकत्र काम केलेले आहे. दोघांनी एकत्रितपणे व्यवहार केले आहेत. त्यामुळे सचिवांनी कागदपत्रे दाखविली नाहीत, या म्हणण्यात तथ्य नाही. दोघांनी मिळून गैरव्यवहार केल्याचा आरोप असून दोघांनाही काढून टाकण्यात आले आहे व आपापसातील वादामुळे दोघे अशा प्रकारचे अर्ज व अपिले करीत आहेत, असेही प्रतिपादन श्री.डोंगळे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१९.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे -४११ ००१

श्री. दिनकर सदाशिव कांबळे
४०, वानवडी गाव, पुणे-४० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मानद सचीव,
अपंग कल्याणकारी व संशोधन संस्था, वानवडी,
पुणे-४११ ०४०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
अपंग कल्याणकारी व संशोधन संस्था, वानवडी,
पुणे-४११ ०४०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८३ / पुणे |
| २ | सनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दिनकर सदाशिव कांबळे
४०, वानवडी गाव, पुणे-४०

**जन माहिती अधिकारी**
अपंग कल्याणकारी व संशोधन संस्था, वानवडी,
पुणे-४११ ०४० श्री. प्रदीप बबनराव वाजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.९.२००६ |
| ५ | जानमाहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि..२६.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपंग कल्याणकारी संशोधन संस्था, वानवडी, पुणे यांना तीन एकर सहा गुंठे जागा शासनाने विशिष्ट अटीवर दिलेली आहे. या जागेचा वापर तसेच संस्थेने घेतलेल्या अन्य जागा याबाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा मानद सचीव, अपंग कल्याणकारी संशोधन संस्था, वानवडी, पुणे यांनी माहिती न देता अन्य बाबींवर उत्तर पाठविले. संस्थेची बदनामी करणार नाही, असे प्रतिज्ञापत्र करुन देण्याची अट माहिती देण्यासाठी आपल्याला कळविली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. दिनकर सदाशिव कांबळे यांनी केले.

श्री. कांबळे संस्थेकडे विविध स्वरुपाचे अर्ज सातत्याने करीत असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. कपोकल्पित बाबींची माहिती ते मागत असतात. संस्थेने त्यांचे आजीव सदसत्व कायमचे रद्द केल्यामुळे, तसेच त्यांच्या विरुध्दच्या अन्य विषयासंदर्भात संस्थेने केलेल्या कारवाईमुळे विविध स्वरुपाचे अर्ज, विविध खात्यांकडे तक्रारी, न्यायालयांत दावे अशा प्रकारे ते संस्थेला त्रास देत असतात. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली. संस्थेविरुध्द त्यांनी केलेले दावे धर्मादाय आयुक्त व अन्य न्यायालये यांनी फेटाळले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मानद सचिव, अपंग कल्याणकारी संशोधन संस्था, वानवडी, पुणे बी. एस. जगदाळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.कांबळे व संस्था यांच्यामध्ये असलेल्या वादापोटी श्री.कांबळे माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन दिसते. मात्र त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत उत्तर विहित मुदतीत दिले गेले पाहिजे, याची जाणीव जन माहिती अधिकारी, अपंग कल्याणकारी संशोधन संस्था, वानवडी, पुणे यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी मांडलेले अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेण्यायोग्य नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २०.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शामराव यशवंत चोपडे
स.नं.३९/७, औंध रोड, आनंदनगर,
बोपोडी, पुणे-४११ ०२० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता (पथ पश्चिम)
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. शामराव यशवंत चोपडे<br>स.नं.३९/७, औंध रोड, आनंदनगर,<br>बोपोडी, पुणे-४११ ०२०<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री. ना. न. बारापात्रे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१०.२००६ |
| माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. ७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागणी केलेल्या एकूण १९ मुद्दयांपैकी फक्त ९ मुद्दयांची माहिती दिली. ऊर्वरित माहिती गोपनीय असल्याच्या कारणावरुन नाकारण्यात आली. माहिती विलंबाने दिलेली असतानाही छायांकित प्रतींचे शुल्क घेतले. हे शुल्क परत मिळावे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. शामराव यशवंत चोपडे यांनी केली.

श्री. चोपडे यांचा अर्ज दि.२.८.२००६ चा होता. त्यांना दि.१.९.२००६ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर पाठविले. मुद्दा क्र.९ व मुद्दा क्र. ११ ते १९ मधील माहिती लेखा परीक्षण अहवाल व बांधकाम चाचण्या संदर्भातील होती. ती गोपनीय असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, (पथ ), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. माधव रघुनाथ लाटकर यांनी कळविले व ही माहिती विलंबाने दिली, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, श्री. नामदेव न. बारापात्रे यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, श्री. माधव रघुनाथ लाटकर यांनी विलंबाबातचा खुलासा तीन दिवसांत करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. शुल्क परत करण्याची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

श्री. चोपडे यांना त्यांच्या अर्जातील मुदा क्र.९, व मुद्दा क्र. ११ ते १६ व १८ यांची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (जे ) नुसार देता येत नसल्याचे कळविले. ऊर्वरित माहिती विहित मुदतीत देण्यात आली. श्री. चोपडे यांनी कम्युनिटी हॉल बांधकामाच्या संदर्भातील माहिती मागितली होती. या बांधकामात काही गंभीर व आक्षेपार्ह बाबी आढळल्यामुळे जरुर त्या प्रशासकीय आदेशासाठी प्रकरण महानगरपालिका आयुक्तांकडे सादर केले होते. कामाचा

दर्जा, त्याच्या विविध तपासण्या या कामी नेमलेल्या विशेष तज्ञ सल्लागारांचे अहवाल अशा मुद्दयांबाबत श्री. चोपडे यांनी माहिती मागितली होती. ती या नस्तीमध्ये समाविष्ट होती. दोषी असणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत निर्णय करण्यापूर्वी त्यांना माहिती देणे प्रशासकीय कामकाजाच्या संहितेनुसार ते योग्य ठरले नसते. म्हणून ती माहिती त्यावेळी नाकारली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. माधव रघुनाथ लाटकर यांनी दि. २१.२.२००९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या खुलाशात नमूद केले आहे. हा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीकृष्ण नामदेव पाटील — अपीलकर्ता
द्वारा श्री. अशोक गोगावले
सर्व्हे नं.१४, डॉ. पाटील यांच्या दवाखान्यामागे,
हडपसर, पुणे-२८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
तांत्रिक शाळा आवार, घोले रोड, शिवाजीनगर, — उत्तरवादी
पुणे-५ श्री. एम. जी. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
तांत्रिक शाळा आवार, घोले रोड, शिवाजीनगर,
पुणे-५ श्री. डी. सी. नेवसे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. श्रीकृष्ण नामदेव पाटील<br>द्वारा श्री. अशोक गोगावले<br>सर्व्हे नं.१४, डॉ. पाटील यांच्या दवाखान्यामागे,<br>हडपसर, पुणे-२८ |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,<br>तांत्रिक शाळा आवार, घोले रोड, शिवाजीनगर,<br>पुणे-५ श्री. एम. जी. पाटील |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,<br>तांत्रिक शाळा आवार, घोले रोड, शिवाजीनगर,<br>पुणे-५ श्री. डी. सी. नेवसे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.८.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

चौकशी समितीला प्राचार्यांनी दिलेले उत्तर जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, तांत्रिक शाळा आवार, घोले रोड, पुणे यांनी दडवून ठेवून त्याच तारखेस वेगळे पत्र दिले. याबाबत आपण केलेल्या तक्रारीची दखल घेतली नाही, या तक्रारी माहिती अधिकारात केलेल्या नव्हत्या. जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे यांनी अयोग्य कामे केली असून ती उघड होऊ नयेत म्हणून माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. श्रीकृष्ण नामदेव पाटील यांनी केले.

संबंधित चौकशी अहवाल चार सदस्यांच्या समितीने सादर केला असून त्याबाबतची १७९ प्रतींची माहिती श्री. पाटील यांना देण्यात आली आहे, त्यावर त्यांची पोहच आहे. स्मरणपत्र पाठवूनही ऊर्वरित माहिती नेण्यासाठी ते आले नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे श्री. डि. सी. नेवसे यांनी केले. चौकशी अहवाल पूर्ण देण्यात आला आहे, तथापि त्यातील काही कागदपत्रे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी परस्पर काढून घेतल्याच्या आपल्या म्हणण्याची दखल घेतली जात नाही, असे श्री.पाटील यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. मात्र वस्तुस्थिती तशी नाही. अहवाल चुकीचा असल्याचे श्री. पाटील यांचे म्हणणे आहे, त्याबाबत वेगवेगळ्या पातळ्यांवर त्यांनी अर्ज केले आहेत. त्यांनी नमूद केलेल्या क्रमांकाचे पत्र आढळत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, तांत्रिक शाळा आवार, घोले रोड, पुणे श्री. एम. जी. पाटील यांनी केले.

श्री. पाटील यांनी नमूद केलेले पत्र क्र. ५६२७ बाबत शोध घेऊन त्याची प्रत अथवा त्याबाबत योग्य तो खुलासा आठ दिवसात करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित खुलासा श्री. पाटील यांना केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

(स्वाक्षरी) (शिक्का: राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.सदाशिव आप्पासाहेब नाईक
चेअरमन, श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित,
हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता
(२)श्री.राजेंद्र दादू चौगुले
महावीरनगर, प्रथमेश कॉम्प्लेक्स रोड, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन,
श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित,
हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

(२)**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित,
हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८८+६४१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.सदाशिव आप्पासाहेब नाईक
चेअरमन, श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित,
हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर (अ.क्र.६४१)

(२)श्री.राजेंद्र दादू चौगुले
महावीरनगर, प्रथमेश कॉम्प्लेक्स रोड, हुपरी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर (अ.क्र.५८८)

(१)**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर प्रतिनिधी ॲड.पी.जे.वाघ
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर प्रतिनिधी ॲड.पी.जे.वाघ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९ (अ.क्र.५८८) व दि.२९.५.२००९(अ.क्र.६४१) रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री.राजेंद्र दादू चौगुले यांनी मागितलेल्यातील काही माहिती जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, श्री गणेश सहकारी पाणीपुरठा संस्था मर्यादित, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी दिली. परंतु संपूर्ण माहिती दिली नाही, म्हणून श्री.चौगुले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. माहिती संस्था स्तरावरील असल्याने व संस्थेने ती देणे बंधनकारक असल्यामुळे आठ दिवसांत निःशुल्क द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी दिला. तरीही संस्थेने विनामूल्य माहिती दिली नाही, म्हणून श्री.चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.(अ.क्र.५८८)

संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान, व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही काही माहिती दिली. संपूर्ण व नि:शुल्क माहिती देण्याचा अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेला आदेश चुकीचा असून रद्द करावा, अशी मागणी श्री.सदाशिव आप्पासाहेब नाईक यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.(अ.क्र.६४१)

संस्थेच्या उपसा सिंचनासाठी दिलेली देवस्थान जमीन सरकारची आहे, असे प्रतिपादन श्री.चौगुले यांनी केले. मात्र देवस्थानची जागा संस्थेने विकत घेतली आहे. संस्था स्वभांडवलावर व्यवसाय करीत आहे, शासकीय भागभांडवल नाही, तसेच संस्थेने घेतलेल्या कर्जाला शासनाची हमी नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच)अन्वये ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तिला लागू नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी ॲड.पी.जे.वाघ यांनी केले. संस्था सार्वजनिक प्राधिकरण कशा प्रकारे ठरते हे अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर स्पष्ट करू शकल्या नाहीत. वरील बाबी लक्षात घेता, श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादित, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर संस्थेकडील माहिती देणे, ती सार्वजनिक प्राधिकरण असल्याचे सिध्द झाल्याशिवाय बंधनकारक करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील क्र.५८८ अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपील क्र.६४१ मान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. पंढरीनाथ दुलाजी तिटकारे
मु. पो. नायकोडी, ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, खेड, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत नायफड, ता.खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९५+६६३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, खेड, जि. पुणे श्री. एम.एम.कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत नायफड, ता.खेड, जि. पुणे श्री. एन.जे.नाईकडे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५९५/ पुणे | २०.१.२००६ | ८.१२.२००६ | -- | २०.९.२००६ |
| ६६३ / पुणे | २०.९.२००६ | ८.१२.२००६ | -- | २०.१२.२००७ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

घराची नोंद व ग्रामसभेला असलेले अधिकार या संबंधीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी देत नाहीत. ग्रामसभेचे निर्णय मानले जात नाहीत असे अपीलकर्ता श्री. पंढरीनाथ दुलाजी तिटकारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात व लेखी निवेदनात नमूद केले आहे.

वैयक्तिक नावावर घराची नोंद करावी, असा अपीलकर्त्याचा आग्रह होता. त्याप्रमाणे आधीची नोंद रद्द करून नवीन नोंद केलेली आहे. याच विषयासाठी अपीलकर्ता श्री. तिटकारे सातत्याने अर्ज व अपिले करीत आले असून या कामासाठी ग्रामपंचायतीवर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांना या पूर्वी लेखी कळविले आहे. याच विषयाच्या संदर्भात आयोगाकडे यापूर्वीही त्यांचे अपील क्र. ५७ चा निर्णय झाला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नायफड श्री. एन.जे. नाईकडे यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेले कागदपत्र पाहता ते योग्य आहे. श्री. तिटकारे यांच्या अर्जातील अनेक (उदा. मुद्दा क्र.५ व ७) मुद्दे माहितीच्या अधिकारात येणारे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शहाजी श्रीपती पाटील — अपीलकर्ता
मु.पो.तिरपण, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,
श्री. विलासराव कोरे हायस्कूल म्हांळूंगे तर्फे बोरगाव,
पो. का|| ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शहाजी श्रीपती पाटील
मु.पो.तिरपण, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.ए.एम.सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,

श्री. विलासराव कोरे हायस्कूल म्हांळूंगे तर्फे बोरगाव,

पो. का|| ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर प्र.श्री.राजाराम आनंदा नलवडे

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | १७.६.२००८ व ७.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | २२.७.२००८ व १०.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | २२.७.२००८ व १.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | १.९.२००८ व १५.११.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

दिनांक १७.६.२००८ च्या माहिती अर्जानुसार सन २००२ ते २००७ अखेर प्रत्येक वर्षाच्या शिक्षण सेवक संच निश्चितीसाठी सादर केलेले शाळेचे वेळापत्रक, वार्षिक तपासणीसाठी शिक्षक यादीची छायाप्रत असे एकूण ४ मुद्दे व दिनांक ७.८.२००८ च्या माहिती अर्जान्वये वरील बाबी संदर्भातील एकूण १४ मुद्दे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२७.१०.२००९ रोजी घेण्यात आली.

आपण दोन अर्जांद्वारे मागितलेल्या माहितीतील काही मुद्दयांची माहिती मिळाली ऊर्वरित माहिती दिली नाही. अपुरी माहिती दिल्याबद्दल संस्थेला शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शहाजी श्रीपती पाटील यांनी केली. संस्थेकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे आपण जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडे अर्ज केला. त्यांनी निर्णय देऊनही संस्थेने माहिती दिली नाही, म्हणून दि.२०.१.२००९ रोजी संस्थेकडे तिसरा अर्ज केला. त्यानंतरही माहिती मिळाली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त आठ दिवसात माहिती देण्याचे कबूल करूनही कोणतीही

माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.पाटील यांनी केले. बैठकीच्या नोंदीची वही, सन २००२ ते २००७ पर्यंतच्या बैठकीच्या वहीच्या प्रथम पानावर असलेल्या पर्यवेक्षकाच्या सहीची प्रत आपल्याला मिळालेली नाही. संस्थेने सहाय्यक शिक्षक पदावरून आपल्याला कमी केल्याने आपण न्यायालयात संस्थेविरूध्द दाद मागत असून त्यासाठी ही माहिती मिळणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

श्री.पाटील सहाय्यक शिक्षक होते व काही कागदपत्रे त्यांनी स्वतःच नेली आहेत. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती त्या त्या वेळी त्यांना देण्यात आल्या आहेत. बैठकीच्या वहीच्या प्रथम पानावर सही घेतलीच पाहिजे, असे एस.एस.कोडमध्ये बंधन नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, श्री विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.राजाराम आनंदा नलवडे यांनी केले. त्यावर श्री.पाटील यांनी बैठकीची त्यांच्याकडील एक वही सादर केली व तिच्या पहिल्या पानावर सही असल्याचे दाखविले, व या प्रकारे चुकीची माहिती दिली जात असल्याचे प्रतिपादन केले. ही वही अपीलकर्ता यांच्याकडे कशी आली, अशी विचारणा आयोगाने केली असता, त्यावेळी आपल्याकडे पदभार असल्यामुळे ती वही आपल्याकडे असल्याचे श्री.पाटील यांनी नमूद केले. तसेच अशा प्रकारे संस्थेची कागदपत्रे स्वतःकडे ठेवणे हा गुन्हा असल्याचेही त्यांनी मान्य केले.

संस्थेच्या लेटरहेडवर सक्षम प्राधिकाऱ्यांनी अनुभवाचा दाखला द्यावा, अशा स्वरूपाच्या मागण्या श्री.पाटील यांनी केल्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ती 'माहिती' ठरत नाही. तसेच शाळेचे वेळापत्रक, उत्तरपत्रिकांच्या प्रती प्रदीर्घ काळ जतन करून ठेवणे बंधनकारक नाही. संस्थेने बहुतेक मुद्दयांची माहिती दिली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.ए.एम.सूर्यवंशी यांनी नमूद केले. द्यावयाची राहिलेली संस्थेकडील उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, श्री विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी आठ दिवसात द्यावी व त्याबाबत स्वतः तपासणी करून अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी

(माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एम.जी.चिखलीकर यांनी आयोगाला दि.२९.१२.२००९ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.११.२००९